**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, OCT-NOV, 2020, VOL- 8/42*

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद : एक अभ्यास

**जगदिश बाबूलाल राठोड, Ph. D.**

*प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगांव, ता.श्रीगोंदा, अ.नगर.*

**Abstract**

*ब्रिटिश साम्राज्यवाद, स्वातंत्र चळवळ, जगभरातील फॅसिस्टांची चळवळ, मानव मुक्तीचे लढे आणि भारतीय भयाण विषमता या सगळ्या जळत्या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विवेकनिष्ठ समाजवादी स्वभावाच्या राष्ट्रवादाची उभारणी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सव्यसाची लेखक, निष्ठावान संपादक, झुंझार क्रांतीकारक व प्रचंड प्रभावी नेतृत्व होते. त्यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद हा आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. राजकीय हक्क आणि कर्तव्ये या आधारे स्व-विकासातून राष्ट्रविकास घडवण्यासाठी.*

[CC BY] Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

## प्रस्तावना

सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी शिक्षणाच्या बळावर माणूस चारित्र्यसंपन्न आणि सुसंस्कृत बनतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतीय शिक्षणात चारित्र्य संपन्न आणि राष्ट्रप्रेमी नागरिक घडवण्यावर भर दिला आहे. प्रेरणादायी व्यक्तिम्त्वाच्या साहित्यातून आणि आचार-विचारातून प्रकट होणारा राष्ट्रवादाचे मूलत: तीन प्रवाह असल्याचे आपणास दिसून येते. पहिला प्रवाह हा समृध्द भूतकाळ, श्रध्दा व संस्कृती यांची धर्मनिष्ठ गोळाबेरीज मांडणारा व हिंदुत्वाची दिशा घेऊन निघालेले राष्ट्रवाद. दुसरा प्रवाह हा भारतातील विविधेतील एकतेवर विशेष भर देणारा

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

उदारमतवादी वळणाचा गांधी, नेहरु यांचा राष्ट्रवाद आणि शेवटी क्रांतीसूर्य महात्मा फुले, आगरकर आणि डॉ.बाबासाहेब यांच्या विचार मंथनातून प्रकट झालेल्या राष्ट्रवादाचा प्रवाह. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार मंथनातून प्रकट झालेल्या राष्ट्रवादाला शोषण मुक्तिचा आधार आहे. सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य वगळल्यास स्वातंत्र्य ही संकल्पना मर्यादित व संकुचित होते हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ओळखून होते. त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना ही धर्मातील, धर्मविहीन, इहवादी स्वभावाची होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवादाला बुध्दीप्रामाण्यावादाचे तत्वगंभीर अधिष्ठान होते. तसेच क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचा समाधिष्ठित राष्ट्रवाद हा त्याचा पाया होता. ब्रिटिश साम्राज्यवाद, स्वातंत्र चळवळ, जगभरातील फॅसिस्टांची चळवळ, मानव मुक्तीचे लढे आणि भारतीय भयाण विषमता या सगळ्या जळत्या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विवेकनिष्ठ समाजवादी स्वभावाच्या राष्ट्रवादाची उभारणी केली. ज्या व्यक्तीच्या वाट्याला आयुष्यभर सामाजिक विषमता आणि अवहेलना आली अशा व्यक्तीने आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर उत्तुंग विद्या व यश संपादन केले आणि तरीही आपल्या लेखनात त्याबद्दल कोठेही आक्रोश किंवा सूड घेण्याची भाषा नाही. आपल्या विद्येच्या आणि विवेकाच्या जोरावर सामाजिक, राजकिय आणि आर्थिक क्षेत्रात केलेल्या लेखनातून समस्त मानव जातीचे हित चिंतले आहे.

सामाजिक सुधारणा आणि राजकारणाशी संबंधित वर्तनातून त्यांनी केवळ राष्ट्रहित विचारात घेतले. धार्मिक स्थित्यांतराच्या दरम्यान धर्मांतराची घोषणा केली पण स्वदेशातील समतेची शिकवण देणार भगवान गौतम बुध्द यांनी सुरु केलेला बौध्द धर्म स्वीकारला. यातून प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दलची त्यांची अस्था प्रकट होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत, आम्ही भारताची संतान असून, आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाण आहे. राष्ट्रावर संकट आल्यावर प्राण पणाला लावून देशाचे रक्षण करु, त्यांचे देशाप्रती असलेले प्रेम पाहून इंग्रज पत्रकार संभ्रमात असत की त्यांना स्वातंत्र्यसेनानी म्हणावे की क्रांतिकारक म्हणावे? भारतीय

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

राज्यघटनेची निर्मिती करताना त्यांनी समतेला प्राधान्य दिले. भारत अखंड राहावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीय स्त्रीयांना त्यांनी मतदानाचा अधिकार न मागता दिला. युरोपातील स्त्रीयांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी लढा उभारावा लागला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या अनुयायांना सामाजिक विषमतेचे प्रचंड चटके सहन करावे लागले तरीही त्यांनी वेगळ्या राष्ट्राची मागणी केली नाही. भारताच्या फाळणी दरम्यान बॅरिस्टर जीना यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पाकिस्तानाच्या गव्हर्नर पदाचे आमिष दाखवले होते. १९४९ साली भारताने चीन ला युनोचे सदस्यत्व मिळावे म्हणून मागणी केली. यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी टीका केली होती. तसेच १९५४ साली चीनसोबत पंचशील धोरण राबवताना बाबासाहेब म्हणाले होते की, चीन हे धूर्त राष्ट्र आहे, भारताने गाफील न राहता व आदर्शवादी दृष्टीकोनातून चीनशी मैत्री करु नये. पंचशील धोरण हे बौध्द धर्माचा अविभ्याज्य भाग असून चीन या धोरणाचा अवलंब करताना दिसत नाही. हैदराबाद संस्थ्यानावर पोलीस कारवाई दरम्यान युनोने आक्षेप घेऊ नये म्हणून सरदार वल्लभभाई पटेल हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत वारंवार चर्चा करत असत. भारतीय राज्यघटना निर्मिती वेळी कलम ३७० घटनेत अंतर्भूत करण्यास बाबासाहेबाचा विरोध होता. पुढे कलम ३७० हे भारतीय राजकरणाची कायम डोकेदुखी राहिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सव्यसाची लेखक, निष्ठावान संपादक, झुंझार क्रांतीकारक व प्रचंड प्रभावी नेतृत्व होते. त्यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद हा आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सद्याच्या भारतीय राजकारणाबाबत बोलायचे झाले तर आंबेडकर यांचा राष्ट्रवाद हा देशाला एकसंघ ठेवेल आणि देश प्रगती पथावर जाईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चारित्र्य आणि विवेकनिष्ठ राष्ट्रवादाची विद्यार्थ्यांना शालेय जीवनात ओळख करुन दिल्यास निश्चितच देशाचे भावी नागरिक चारित्र्यसंपन्न आणि विवेकनिष्ठ राष्ट्रवाद बाळगणारे सुजान नागरिक घडतील अशी आशा आहे. सदर

संशोधनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचा आढावा घेण्याचा संशोधकाचा प्रयत्न राहिल.

**संशोधनाची गरज : -** संशोधकाला सदर संशोधनाची गरज पुढील बाबतीत वाटली.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून व्यक्त होणारे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत ज्यातून उर्ध्वगामी सामाजिक गतीशीलतेला चालना मिळण्यासाठी

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सलोख्यासाठी घेतलेली वास्तववादी भूमिका अभ्यासण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आचार-विचारात राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रनिष्ठा होती. ते राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रनिष्ठा समाजापुढे आणण्यासाठी सदर संशोधन गरजेचे वाटते.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून प्रकट झालेले काही अप्रकाशित पैलू समाजासमोर मांडण्यासाठी सदर संशोधन गरजेचे वाटते.

**संशोधनाचे महत्व : -** संशोधनाचे महत्व पुढील प्रमाणे आहे.

१. सामाजिक सलोखा प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त

२. चारित्र्यसंपन्न पिढी घडवण्यासठी

३. राष्ट्रवादी युवक-युवतींची जडणघडण करण्यासाठी

४. राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रेरक विचारांची पेरणी करण्यासाठी

५. आर्थिक, सामाजिक व राजकीय संपन्नता घडवण्यासाठी

६. आधुनिक भारताची वैचारिक बैठक पक्की करण्यासाठी

७. राजकीय हक्क आणि कर्तव्ये या आधारे स्व-विकासातून राष्ट्रविकास घडवण्यासाठी

८. धर्मनिरपेक्ष, विधायक सामाजिक चळवळींना नवसंजीवनी प्राप्त करुन देण्यासाठी

९. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात विवेकनिष्ठ राष्ट्रवादाची माहिती करुन देण्यासाठी सदर संशोधन महत्त्वपूर्ण वाटते.

**संशोधनाची उद्दिष्टे : -**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक योगदान अभ्यासणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय योगदान अभ्यासणे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक योगदान अभ्यासणे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यातून प्रकट होणारा राष्ट्रवाद अभ्यासणे.

५. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे योगदान यांचे विश्लेषण करणे.

६. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातून प्रकट होणारी विवेकनिष्ठ राष्ट्रवादाची सद्यस्थितीतील उपयुक्तता निश्चित करणे.

**समस्या विधान : -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व राजकिय बाबतीत केलेल्या लेखनातून प्रकट होणारा आणि राष्ट्रीय एकता आणि एकात्मतेसाठी आवश्यक असणारा त्यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद अभ्यासणे.

**कार्यात्मक व्याख्या : - विवेकनिष्ठ :** सार्वजनिक जीवनात वावरताना आचरणात आणलेला संतुलित, वैज्ञानिक व वास्तव आचार-विचार व कृती.

**राष्ट्रवाद :** एक वस्तुनिष्ठ आणि सदसदविवेकशक्तीची भावना ज्यातून केवळ आणि केवळ राष्ट्रीय हित आणि एकात्मता याचाच सदैव विचार.

**शिल्पकार :** भारतीय राज्यघटना हा मुलभूत कायदा लिहिण्यासाठी, निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतलेली तज्ञ व्यक्ती.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**राष्ट्रीय एकता व एकात्मता :** भारतीय नागरिकांचे एकमेकांशी सलोख्याचे व एकजुटीचे संबंध ज्याव्दारे आपण भारतीय असल्याची भावना व्यक्त होते.

**संशोधनाची गृहितके :**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारप्रणाली समताधिष्ठीत समाजरचनेवर आधारलेली आहे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनात राष्ट्रीय एकता आणि एकात्मता यासाठी उपयुक्त आशय आहे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित वाड्मय सर्वसामान्यांना अभ्यासण्यासाठी उपलब्ध आहे.

**संशोधन परिकल्पना : -** १. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विपुल ग्रंथसंपदेचे अवलोकन केल्यास त्यातून त्यांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचा आढावा घेता येईल.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले ज्ञानार्जन, लेखन, भाषणे यातून त्यांचे विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचा आढावा घेता येईल.

**संशोधन साधने व तंत्रे : -** सदर संशोधनासाठी खालील साधने व तंत्रे यांचा वापर केला जाणार आहे.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन / वाड्मय

२. समकालीन संदर्भ साहित्य — शासकीय परिपत्रके / गॅझेट

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता / निबंध लेखन

४. विविध आंदोलना दरम्यानच्या नोंदी उदा. सत्याग्रह, शेतकरी संप, पुणे करार, विविध समित्यांसमोरील साक्ष इ.

५. भारतीय राज्यघटना

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संशोधन व्याप्ती व मर्यादा — संशोधनाची व्याप्ती —**

१. सदर संशोधन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनसाहित्य / वाङ्मय, भाषणे, त्यांनी सुरु केलेली वृत्तपत्रे, पाक्षिके इत्यादीतील मजकुराशी संबंधित असेल.

२. सदर संशोधन हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनमूल्यांशी निगडीत असेल.

३. सदर संशोधन हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्रजी व मराठी या भाषांमध्ये लिहिलेल्या साहित्य / ग्रंथसंपदेशी निगडीत असेल.

**संशोधनाची मर्यादा : -** १. सदर संशोधन हे केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाच्या लेखन साहित्यापुरतेच मर्यादित असेल.

२. सदर संशोधन हे वर्ष १८५१ ते १९५६ या कालावधीपुरतेच मर्यादित असेल.

**संशोधनाचे वेगळेपण : -** संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतल्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित पुढील बाबतीत संशोधन झालेले आढळले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार, त्यांचे प्रभावी व्यक्तीमत्व, त्यांची राज्य समाजवादाची संकल्पना, त्यांची ललित लेख अभिव्यक्ती, त्यांचे वैचारीक लेखन व भाषणे त्यांचे ऐतिहासिक चिंतन, स्त्रीमुक्ती बाबतचे कार्य, भारतीय राजकारण आणि विकास, त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र या संबंधित जीवन व कार्य, धर्म अभ्यासक व विश्लेषक इत्यादी. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यातून / वाङ्मयातून व्यक्त होणारा त्यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद याचे विश्लेषण करणार आहे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्र आणि त्यतील नागरिक यांच्च्याशी असलेली बांधिलकी याचा विचार करणार आहे.

## संदर्भ सूची

*मुळे, रा.श. आणि उमाठे, वि.तु (१९८७) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.*

कु-हाडे बी.एम (२००७) शास्त्रीय संशोधन पध्दती पिंपळखुरे आणि कं.प्रकाशन, नागपूर.
भिंताडे, वि.रा. (२००५) शैक्षणिक संशोधन पध्दती नूतन प्रकाशन, पुणे.
भिंताडे, वि.रा. (२००८) शैक्षणिक संशोधन पध्दती नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
बापट, भा.गो (१९९९) शैक्षणिक संशोधन पध्दती नूतन प्रकाशन, पुणे.
मुळे, रा.श. आणि उमाठे, वि.तु (१९९८) शैक्षणिक संशोधन पुणे – श्री विद्या प्रकाशन
आगलावे प्रदीप (२०००) शैक्षणिक संशोधन पध्दती व तंत्रे, नागपूर – विद्या प्रकाशन
कदम डॉ.च.प २००७ शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्यनुतन प्रकाशन पुणे.
दुनाखे डॉ.अरविंद, २००६ प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, नित्यनुतन प्रकाशन पुणे.
सोनटक्के डॉ.विणा, पाटील डॉ.प्रशांत, २०१३ संशोधन, शैक्षणिक संशोधन, पुणे.
कीर धनंजय (१९६६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
मोरे दिनेश (२००६), आधुनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास (१८१८ ते १९६०) के. एस. पब्लिकेशन, पुणे.
कीर धनंजय, मालशे स.ग. (संपा) (१९६९) म.फुले समय वाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई.
पारसनीस हेमलता (२००९) शैक्षणिक संशोधन नमुना निवड नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
पंडित बन्सी बिहारी (२००८), शिक्षणातील संशोधन नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
Best, J.W. and Kahn, J,V (२००५) Research in Education (९th edition) New Delhi : Prentice Hall of India Pvt. Ltd.
Koul Lokesh, (१९९०) Methodology of Education Research. New Delhi : Vikas Publishing House Pvt.Ltd.
www.esakal.sampadakiy editorial. Dr.Babasaheb Ambedkar Mahaparinirvan din. ६th Dec.२०१७ By Prof. Dr. Anil Nitnavare.

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language